## निशाणी क्र. ७० वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ चे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र. ६ रविंद्र शंकर वारंग हे दि. २१/०४/२०21 रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत. त्यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

प्रतिवादी क्र. ६ – रविंद्र शंकर वारंग – मयत वारस

अ) रोशनी रविंद्र वारंग, (पत्नी)
वय – ४८ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
रा. – ६/२, साईकृपा रहिवाशी संघ, बेहराम बाग, संतोष नगर,
जोगेश्वरी पश्चिम, मुंबई.

सबब वर नमूद केलेप्रमाणे सदर प्रतिवादी क्र. ६ यास वारस असून त्यांना सदर दाव्यात सामील करुन मिळणेस व त्याप्रमाणे दाव्याचे कामी तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तूत वादीचे वारसानी केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्जात दिलेले कारण योग्य व संयुक्तीक नाही. सबब अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ नुसार वादी, प्रतिवादी मयत झालेस त्याच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करून घेणेची तरतूद आहे. प्रस्तूत प्रतिवादी क्र. ६ हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. वादी यांनी सदरचा दावा वाटप व पृथक कब्जाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्याचे कामी सदरची दुरूस्ती महत्वाची आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. सबब त्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी देणे उचित वाटते. त्यामुळे सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब खालील आदेश पारीत करीत आहे:

**– आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तूत प्रतिवादी क्र. ६ यांचे वारस दाव्यात समाविष्ट केल्यानंतर वादीने दाव्यात दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्ती प्रत दाखल करणेची आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–
( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक: ०४/१०/२०२१